# पिंपरी चिंचवड महानगरपालिकेचा इतिहास

पिंपरी चिंचवड परिसराला खुप प्राचीन इतिहास असुन चिंचवड गावातील मोरया गणपती पेशवेकालीन देवस्थान देशभर प्रसिध्द आहे. भारत - पाकिस्तान फाळणी नंतर सन १९४८ साली भारत सरकारने पिंपरी गावामध्ये १६०९ गाळे व २९९ प्लॉट्स पाकिस्तानातून आलेल्या सिंधी निर्वासितांसाठी २०३ एकर क्षेत्रावर निर्माण केले, ह्यालाच पिंपरी कॅम्प असे म्हणतात. सन १९५६ साली या परिसरात हिंदुस्थान ॲन्टीबायोटिक्स हा मोठा कारखाना सुरु झाला व सन १९६१ - ६२ साली एम.आय.डी.सी. ने टेल्को इंडस्ट्रीजच्या आजूबाजूस पहिली इंडस्ट्रीयल इस्टेट निर्माण केली.

ह्यामुळे लघुउद्योगांना चालना मिळाली व मोठ्या प्रमाणावर रोजगार संधी (कुशल व अकुशल) उपलब्ध झाल्या. गेल्या ४ दशकात महाराष्ट्रातील कानाकोपऱ्यातून तसेच राज्याच्या बाहेरुनही लोक उपजिविकेसाठी येथे येऊन स्थायिक झाले आहेत. त्यामुळे या गावांची लोकसंख्या झपाट्याने वाढली आहे. सन १९७० साली पिंपरी, चिंचवड, भोसरी व आकुर्डी गावांचे विलीनिकरण करुन पिंपरी चिंचवड नगरपालिका स्थापन करण्यात आली. ह्या भागाचे वाढते औद्योगिकरण व शहरीकरण लक्षात घेता पुणे मेट्रो पोलिटियन रिजनल प्लॅनिंग बोर्डाने पिंपरी चिंचवड नगरपालिकेच्या उत्तरेला सन १९७० साली पिंपरी चिंचवड नवनगर प्राधिकरण ( पी.सी.एन.टी.डी.ए.) स्थापन केले. सन १९७५ साली शहराच्या नगरपालिकेचे 'क' दर्जातून 'अ' दर्जामध्ये रुपांतर झाले. सन १९८२ साली आजुबाजुच्या ७ गावांच्या तसेच पी.सी.एन.टी.डी.ए. क्षेत्राचा समावेश करुन ८६ चौ.कि.मी. क्षेत्रफळाचे ' पिंपरी चिंचवड महानगरपालिका' स्थापन करण्यात आले. सन १९९७ साली आजुबाजुच्या १८ गावांचा ८४.५१ चौ.कि.मी. क्षेत्रफळाचा ग्रामीण भाग पिंपरी चिंचवड महानगरपालिकेमध्ये समाविष्ट करण्यात आला, सध्या शहराचे एकूण क्षेत्रफळ १७०.५६ चौ.कि.मी. आहे.

## शहराचा सध्याचा विस्तार

पिंपरी चिंचवड शहराचा औद्योगिक विस्तार हा महाराष्ट्राच्या औद्योगिक विकासाचे भुषण मानले जाते. टाटा मोटर्स, एस.के.एफ, बजाज ॲटो, फिलीप्स, अल्फा लावल, फोर्स मोटर्स, थरमॅक्स व हिंदुस्थान ॲन्टीबायोटिक्स तसेच बऱ्याच लघु उद्योगांचा विकास ह्या परीसरात झाला आहे. ह्या भागात वाहन उत्पादन उद्योग भरभराटीला आला असून त्यामुळे ह्या परिसराला भारताचे ' डेटॉइट' म्हणुनही ओळखले जाते. या भागात उपलब्ध असणारे लहान / मध्यम / मोठ्या वाहन उत्पादन उद्योगांची संख्या

लक्षात घेऊन या उद्योग क्षेत्राच्या विकासासाठी चांगल्या प्रतीच्या उत्पादनासाठी आवश्यक असणारी अद्यावत माहिती, साहित्य/उपकरणे लागतात परंतु त्याची किंमत महागडी आहे. प्रत्येक इंडस्ट्रीजला ती परवडणारी नसल्याने सदर ऑटोमोबाईल इंडस्ट्रिजला मदत करणेसाठी पिंपरी चिंचवड महानगरपालिकेने एम.सी.सी.आय.ए. व या भागातील कार्यरत असणारे उद्योग समुह, केंद्रशासनाचे डायरेक्टर ऑफ इंडस्ट्रियल प्रमोशन व राज्य शासनाच्या मदतीने **' ऑटो क्लस्टर '** कंपनी सन २००४ मध्ये स्थापन केली आहे. ऑटो क्लस्टर कंपनी स्थापन करण्यामागील उद्देश असा की, उद्योगांना त्यांच्या उभारणीत / उत्पादनांची क्षमता-दर्जा वाढविण्यासाठी लागणारी डिझाईन / प्रोसेससाठी आवश्यक असणाऱ्या तांत्रिक बाबींचा आधार देणे, उद्योगांना तांत्रिक सेवा पुरविणे, ज्यामुळे किचकट उत्पादन तयार करण्यासाठी लागणारा वेळ कमी करणे, जागतिक स्तरांचे नवीन उत्पादन तयार करण्यासाठी लागणाऱ्या सेवांची एक खिडकी सेवा पुरवणे, तांत्रिक माहिती उद्योगांना पुरविण्यासाठी कार्यशाळांचे आयोजन करणे इ. ऑटो क्लस्टर मुळे उत्पादनासाठीचा वेळ व दर्जा वाढल्यामुळे उत्पादने निर्यात होतील पिंपरी चिंचवड परिसरातील कंपन्यांना जागतिक बाजारपेठेत वाव मिळेल व वाहन उद्योगांचा विकास होण्यास मदत होईल जागतिक बाजारपेठेत  या भागातील कंपन्यांचे उत्पादन जाऊ शकेल. जागतिक स्पर्धेमध्ये कंपन्या उतरू शकतील. या प्रकल्पामुळे होणाऱ्या उद्योगातील वाढीमुळे नागरिकांना रोजगाराच्या संधी वाढतील. अशा प्रकारच्या प्रकल्पांमुळे भविष्यात औद्योगिकीकरण वाढून पर्यायाने शहरीकरण वाढणार आहे.

पुणे व मुंबईस जोडणारा द्रुतगती महामार्गाची सुरुवात पिंपरी चिंचवड महानगरपालिका क्षेत्रातून होत असल्याने तसेच देहूरोड - कात्रज बाह्यवळण महामार्ग महानगरपालिका क्षेत्रातून जात असल्यामुळे मोठ्या प्रमाणावर शहरीकरण झाले आहे. महानगरपालिका क्षेत्राच्या पश्चिम भागात मिल्ट्री ईस्टॅब्लीशमेंट आहे. (सी.ओ.डी., सी.एम.ई. इ. ) उत्तरेला देहू रोड छावणी त्यामुळे औद्योगिकरणात व निवासी क्षेत्रात त्या ठिकाणी मर्यादा आल्याने पिंपरी चिंचवड शहराकडे लोकांचा ओढा वाढला आहे व त्यामुळे दक्षिणेला पुणे महानगरपालिकेचे क्षेत्र असल्यामुळे शहरीकरण वाढण्यास मदत झाली आहे. उत्तरेला इंद्रायणी नदी असून पश्चिमेला मुळा नदी आहे व पवना नदी शहरातून वहात सांगवी - दापोडी जवळ मुळा नदीला मिळते, पाण्याची मुबलकता असलेने औद्योगिकीकरण व शहरीकरण  झपाट्याने झाले आहे.